# तळेगाव शेती

कृषि पणन मंडळाची तळेगांव दाभाडे येथे १५२ एकर जमीन आहे. यापैकी ५४ एकर क्षेत्र लागवड योग्य असुन ४२ एकर क्षेत्र हे पाण्याच्या तलावाखाली आहे. राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था,आर.के.व्ही.वाय् अंतर्गत प्रोजेक्टसाठी १८ एकर जमीन प्रशिक्षणाकरिता दिलेली असुन ३८ एकर क्षेत्र नाला, रस्ते, ईमारत व पडिक अशी आहे.

## रोपवाटिका :

रोपवाटिकेमध्ये आंबा, चिक्कु, नारळ, आवळा, चिंच, सिताफळ, अंजिर इ. फळझाडांची रोपे/कलमे तयार करून शासकिय दराने शेतक-यांना उपलब्ध करून देण्यात आली.व्यावसायिक पद्धतीने कलमे तयार करण्यात आली असुन चालु वर्षी ७.३० लाख किंमतीची रोपे शेतक-यांना पुरविण्यात आली आहेत.

## फळबाग :

गिलबिलपट्टी प्रक्षेत्रावर २२ एकरावर असलेली पेरू,आंबा, चिक्कु, नारळ, आवळा इ. बागा ५ वर्षे कालावधीसाठी करार करून भाड्याने देण्यात आलेल्या आहेत.

## पाण्याचा तलाव :

पाण्याचा तलाव मच्छीमारीसाठी करार करून भाड्याने देणेबाबत प्रामुख्याने मच्छीमार संस्थेस प्राधान्य द्यावे असा शासन निर्णय असलेने मावळ तालुका मच्छीमार सहकारी संस्थेस ५ वर्षे कालावधीसाठी करार करून देण्यात आलेला आहे.सन २०१२-२०१३ या वर्षी रक्कम रू. ४६,०००/- संस्थेकडुन करारापोटी प्राप्त झालेले आहेत.

तसेच २० गुंठे क्षेत्राची ब-याच वर्षापासुन अस्तित्वात असलेली २ छोटी पाण्याची तळी सन २०१२-२०१३ या वर्षी रक्कम रू. २४,०००/- एवढ्या रक्कमेस कराराने देण्यात आलेली आहेत.

## जमीन आरक्षणाबाबत :

कृषि पणन मंडळाच्या मुख्यफार्म येथिल १०० एकर जमिनीवर स्थानिक तळेगांव दाभाडे नगर परिषदेने टाकलेले आरक्षण रद्द करणेबाबत पाठपुरावा करण्यात आला. सदर संपुर्ण क्षेत्रास कंपाऊड भिंत बांधणेबाबत कार्यवाही चालु आहे.